# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक:१९६७, मुंबई :४००००१.

दूरध्वनी- २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१ फॅक्स नं.२६९२१०२

तार- EDUTECH E_mail desk7@dte.org.in internet :- http://www.dte.org.in


प्रथम प्राधान्य

क्रमांक :७/तंशिसं/अनुदान/अर्थसं/२०१०-११/५४
दिनांक : १६.०८.२०१०

प्रति,
संचालक / प्राचार्य
____________________
____________________
____________________

विषय : अर्थसंकल्पिय अंदाज २०११-१२ आणि सुधारीत अंदाज २०१०-११ (योजनेतर) प्रस्ताव पाठविणेबाबत.

या संचालनालयाने तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांना पत्र क्र. १५/अर्थसं/अर्थ.सुधा/२०११-१२/२४७, दि.१२.०८.१० अन्वये शासकीय संस्थांचे, उपरोक्त वर्षाचे अंदाजपत्रक संचालनालयास सादर करण्याविषयी कळविले आहे.

सर्व अशासकीय अनुदानित संस्थांचे उपरोक्त वर्षाचे अंदाजपत्रक संकलित करुन तद्संबंधीचा एकत्रित प्रस्ताव या संचालनालयातर्फे शासनास सादर करावयाचा आहे. तरी या संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित संस्थांनी त्यांच्या संस्थेचे अर्थसंकल्पिय अंदाज २०११-१२ आणि सुधारीत अंदाज २०१०-११ या संचालनालयास सादर करावेत व त्याची एक प्रत संबंधित विभागीय कार्यालयासही सादर करावी.

*आपल्या संस्थेचे अंदाजपत्रक ज्या कर्मचा-याने / अधिका-याने तयार केलेले असेल त्यांनाच दिनांक रोजी वाजता अंदाजपत्रक संचालनालयास सादर करण्याकरीता पाठविण्यात यावे.*

**संस्थेचे अंदाजपत्रक सादर करतांना त्यासाठी विहीत केलेली प्रपत्रे संस्थांनी संबंधित विभागीय कार्यालयाकडून त्वरीत उपलब्ध करुन घ्यावयाची असून विहीत प्रपत्रात तयार केलेले अंदाजपत्रक टपालाने न पाठवता ते ज्या कर्मचा-याने / अधिका-याने तयार केलेले आहे, त्याचप्रमाणे ज्यांना अर्थसंकल्पाबाबतचे ज्ञान अवगत आहे अशा कर्मचा-यांसोबतच उपरोक्त परिच्छेद क्रमांक २ मध्ये आपल्या संस्थेस निश्चित करुन दिलेल्या तारखेस व वेळेस या संचालनालयास सादर करावयाचे आहे. विहीत मुदतीनंतर आलेले अंदाजपत्रक कुठल्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाही किंवा संस्थेसाठीच्या अनुदान तरतूदीसाठीचा अंदाजपत्रक प्रस्ताव शासनास सादर केला जाणार नाही. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थाप्रमुखांवर राहील, याची कृपया नोंद घ्यावी.**

सदरचे अंदाजपत्रक पाठवितांना खालीलप्रमाणे दर्शविण्यात आलेल्या बाबी लक्षात घेऊन अंदाजपत्रक तयार केलेले असावे.

१. ज्या प्रपत्रातील माहिती अपूर्ण किंवा चुकीची आढळेल ते प्रपत्र स्विकारले जाणार नाही. तसेच सर्व प्रपत्रातील आकडे हे हजारात दर्शविण्यात यावेत. पूर्ण रुपयात आकडेवारी सादर करण्यात येऊ नये. अशा पध्दतीने प्रपत्रे भरुन आणली असतील तर ते अंदाजपत्रक स्विकारण्यात येणार नाही.
२. शासनाच्या दि.१.०४.२००४ च्या शासन निर्णयान्वये संस्थेसाठी मंजूर असलेली पदे, नव्याने निर्माण करण्यात आलेली पदांपैकी भरलेल्या पदांची माहिती प्रपत्र ३ मधे, व दि.१४.०१.२००३ च्या शासन निर्णयान्वये अतिरीक्त ठरविण्यात आलेली परंतू सद्यस्थितीत त्या पदावर कार्यरत अधिसंख्य पदांची माहिती एकत्रित करुन प्रपत्र ३ अ मध्ये त्याचप्रमाणे संस्थेस मंजूर असलेल्या पदांपैकी रिक्त पदांची माहिती प्रपत्र ३ ब मधे दर्शविण्यात यावी.
३. ज्या पदांचा मंजूर पदांमध्ये व अतिरीक्त पदांमध्ये अंतर्भाव करण्यात आलेला नाही अशा पदांबाबतची माहिती स्वतंत्ररित्या विहीत नमून्यात सादर करण्यात यावी.
४. सदरचा प्रस्ताव पाठवितांना वेळोवेळी लागू होणा-या महागाई भत्त्याची वाढ दर्शविण्यात यावी. त्याचप्रमाणे इतर बाबींवर होणा-या वाढीचाही विचार करण्यात यावा.
५. आश्वासित प्रगती योजना, वरिष्ठ श्रेणी / निवड श्रेणी याबाबत देय ठरणा-या थकबाकीच्या रकमेचा देखिल अंतर्भाव करण्यात येवून त्याचे स्वतंत्र विवरणपत्रदेखील जोडावे.
६. वैद्यकीय प्रतिपूर्तीचे प्रस्ताव मंजूरीसाठी सादर केलेले असल्यास त्या रकमांचा देखिल अंतर्भाव करण्यात यावा.
७. वेतनेत्तर खर्च गाहय असलेल्या बाबींबाबत व अनुदान खर्चाच्या मर्यादेत निगडीत दर्शविण्यात यावा.
८. भाडेपट्टी व कर आणि विमा इत्यादी मान्य दरानुसारच देण्यात यावा.

शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक सवेआ २००९/(१४०/०९)/ तांशि २, दिनांक ७ मे २०१० अन्वये अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्थांतील शिक्षकेतर कर्मचा-यांना ६ व्या वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे अर्थसंकल्पिय अंदाजपत्रक सादर करावे.

वर दिलेल्या सूचनांप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात येवून ते या कार्यालयास दिलेल्या वेळेत सादर करावे अन्यथा उशिराने प्राप्त झालेले अंदाजपत्रक स्विकारले जाणार नाही याची पुन्हा जाणीव करुन देण्यात येत आहे.

सा.अ.रायकर

(सा.अ.रायकर)
सहाय्यक संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

प्रत माहिती व पुढील तात्काळ कार्यवाहीसाठी अग्रेषित :-
१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित संस्थांना संचालनालयाने विहीत केलेल्या तारखेस अंदाजपत्रक सादर करण्याबाबतच्या सूचना देण्यात याव्यात तसेच या सोबत जोडण्यात आलेली विहीत प्रपत्रे संस्थांना आपल्या स्तरावर उपलब्ध करुन देण्यात यावीत.
२. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक १५, मुख्य कार्यालय, मुंबई